नमस्कार मंडळी,

२००७ चा वार्षिक अहवाल आपल्याला सादर करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. वर्षभर आपण दिलेल्या प्रतिसादामुळे आमचा उत्साह द्विगुणीत झाला आहे.

२००७ ची सुरुवात संक्रांतीच्या MMLA आयडॉल कार्यक्रमाने झाली. ५ ते १५ वयोगटातील लहान मुलांनी सादर केलेलं गायन कौशल्य पाहुन सर्वच आर्श्चयचकित झाले. ह्या कार्यक्रमाला आपण दिलेल्या प्रतिसादाने आम्ही उत्साहाने वर्षभरासाठी कामे करायला सिध्द झालो.

संक्रांतीनंतर महाराष्ट्र मंडळाने भारतातून आलेली २ दर्जेदार नाटके 'माकडाच्या हाती शँपेन' आणि 'फायनल ड्राफ्ट' आपल्यापुढे आणली. अनेक पुरस्कार मिळालेल्या ह्या दोन्ही नाटकांनी एल.ए. करांचे हदय जिंकले. पुढील वर्षीही अशीच दर्जेदार नाटके येण्याचा संभव आहे. त्या नाटकांनाही आपण असाच प्रतिसाद द्याल अशी आशा करतो. त्यानंतर मे महिन्यामधे सहल आयोजित केली होती. सहलीमध्ये केलेल्या बार्बीक्यूमुळे अधिकच मजा आली. लोकांनी बार्बीक्यू बरोबर क्रिकेट व इतर खेळांचाही आस्वाद घेतला.

उन्हाळयामध्ये महाराष्ट्र मंडळाने अनेक दर्जेदार कार्यक्रमांना सहाय्य केले. श्रुती सडोलीकर यांचा शास्त्रीय संगीताचा कार्यक्रम, डॉ. प्रकाश आमटे यांचा Adopt a village Inc. या संस्थेने केलेला कार्यक्रम व अविनाश धर्माधिकारी यांचे व्याख्यान हे कार्यक्रम लोकांना फारच आवडले. मराठी माणूस, साहित्य, संस्कृती आणि कलेशी निगडीत असलेल्या अशा कार्यक्रमांना आपल्यापुढे आणण्यासाठी महाराष्ट्र मंडळ कटीबद्ध राहील. हया कार्यक्रमांपैकी अविनाश धर्माधिकारांच्या व्याख्यानाचे ध्वनीमुद्रण मंडळाच्या वेबसाईटवर (http://mmla.org) उपलब्ध आहे. त्याचा आपण लाभ घ्यावा हि विनंती. उन्हाळयाच्या कार्यक्रम मालिकेचा शेवट पालोमार शैक्षणिक सहलीने झाला. ग्रहविज्ञानाच्या शाखेची त्यानिमित्याने येथील मराठी समाजाला ओळख झाली.

गणेशोत्सव सनातन धर्म मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही साग्रसंगीत पार पडला. गणेशोत्सवातही आपल्याला स्थानिक कलाकारांचे कौशल्य अनुभवायला मिळाले. ह्या कार्यक्रमाचे चित्रण http://www.youtube.com या वेबसाइटवर सर्वांसाठी उपलब्ध आहे. MMLA असा शब्द शोधाकरीता वापरुन ते आपल्याला बघता येइल. आपल्याला विसर्जनाची इंडियन एक्सप्रेस या भारतातील प्रमुख वृत्तपत्र समूहाच्या मुंबई आवृत्तीने दखल घेतली. गणेशोत्सव यशस्वी करण्यासाठी अनेक लोकांनी आम्हाला मदत केली. या सर्व लोकांचे व कलाकारांचे आम्ही पुन्हा एकदा आभार मानतो.

गणेशोत्सवानंतर सुधीर उपासनी व सारंग हरदास यांनी पुरस्कृत केलेला संदीप खरे व सलील कुलकर्णी यांचा आयुष्यावर बोलु काही हा कार्यक्रम लोकांची मने जिंकुन गेला. त्यानंतर लगेचच महाराष्ट्र मंडळाने दिपावली नाट्य महोत्सव आयोजित केला होता. सर्वच कलाकारांनी अतिशय मेहनत घेऊन ३ एकांकीका सादर केल्या. त्याचे सेट व संगीत एल्. ए. तच स्थानिक कलाकारांनी तयार केले होते. या सर्व कलाकारांचे आम्ही विशेष आभार मानतो.

महाराष्ट्र मंडळाच्या फिरत्या साहित्यालयात सरत्या वर्षात बरीच नवीन पुस्तके आली आहेत. या संधीचा आपण नवीन वर्षात लाभ घ्याल अशी आशा करतो. फिरत्या साहित्यालयाच्या शाखा आपल्या भागात उघडण्यासाठी आपण आम्हाला मदत करावी. आपल्या भागात शाखा आहे की नाही याची माहिती आपल्या मंडळाच्या वेबसाइटवर लायब्ररी विभागात मिळेल.

२००८ च्या समितीने सूत्रे हाती घेतली आहेत. २६ जानेवारी २००८ रोजी २००८ चा पहिला कार्यक्रम – संक्रात हूवर हायस्कूलमध्ये आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचं स्वरूप व अधिक माहिती लवकरच जाहिर करण्यात येईल. २००८ च्या समितीमध्ये अंजली दार्मेला, श्रीपाद रेगे, अनुजा रत्नपारखी आणि वैभव पावले हे नवीन सदस्य आले आहेत. वैभव समुद्र, अतुल रिसवडकर व मेघा गोरे समितीतून निवृत्त होत आहेत. २००८ ची वार्षिक वर्गणी ४० डॉलर वरून ५० डॉलरवर नेण्याचा निर्णय समितीने घेतला आहे. हॉलच्या भाड्यात व खाद्यपदार्थांच्या दरात वाढ झाल्याने हा निर्णय घ्यावा लागत आहे. आपण सर्व दरवर्षीप्रमाणेच सदस्यत्व घेऊन आम्हाला सहकार्य कराल अशी आशा करतो.

महाराष्ट्र मंडळाचे यश आपल्या सहभागावर अवलंबून आहे. मंडळाच्या अनेक उपक्रमात व कार्यक्रमात आपल्या सहभागाची आवश्यकता आहे. विविध भागातल्या (सिमी व्हॅली, वेस्ट एल्. ए) लोकांचा सहभाग मंडळाच्या कार्यक्रमामध्ये वाढवण्याचा आम्ही प्रयत्न करू. आमच्या प्रयत्नांना आपण योग्य तो प्रतिसाद द्याल अशी आशा करतो. सहभागाव्यतिरिक्त महाराष्ट्र मंडळास आर्थिक मदतीची आवश्यकता आहे. ज्यांना मंडळास आर्थिक मदत करण्याची इच्छा आहे त्यांनी कृपया आशुतोष खुंटे यांचाशी ३१०-८६४-२९८९ वर संपर्क साधावा.

आपला लोभ आहेच, तो दिवसेंदिवस अधिक वृद्धिंगत व्हावा ही विनंती.

आपले नम्र,
अभिनय थुटे, आशुतोष खुंटे, अतुल रिसवडकर, मेघा गोरे, निवृत्ती बऱ्हाटे, सौरभ अलुरकर, वैभव पुराणिक, वैभव समुद्र